## निर्माण

# तरुणांच्या ऊर्जेला विधायक वळण

गेल्या पाच-सहा वर्षांत आलेल्या 'स्वदेश', 'युवा', 'रंग दे बसंती' यासारख्या चित्रपटांनी तरुणवर्गात एक वेगळंच चैतन्य निर्माण केल्याची चर्चा मधल्या काळात चालू होती. उच्च शिक्षण, लठ्ठ पगाराची नोकरी, गाडी, बंगला, परदेशवाऱ्या अशा चक्रात अडकलेल्या, चंगळवादी आणि स्वकेंद्री म्हणवल्या जाणाऱ्या युवापिढीचा एक अनोखा चेहरा या चित्रपटांनी समाजासमोर ठेवला. पडद्यावरचे हे ध्येयवादी तरुण प्रत्यक्षातसुद्धा तरुणवर्गाला कुठे तरी भावले म्हटल्यावर समाजासाठी 'काही तरी' करण्याची सुप्त ऊर्मी आजच्या तरुणांमध्येही आहे हे त्यातून जाणवलं. पण बहुसंख्य वेळेला हे 'काही तरी' म्हणजे नक्की काय याचं उत्तर या तरुणांना मिळत नाही आणि मार्गदर्शनाअभावी त्यांच्यातील ठिणगी विझून जाते. असं होऊ नये म्हणून आजच्या तरुणाईतल्या याच ऊर्मीला साद देत डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग यांच्या प्रेरणेतून २००६ साली 'निर्माण' ही युवा चळवळ सुरू झाली. 'निर्माण'ची संकल्पना महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या 'नई तालीम' या अभिनव शिक्षणप्रक्रियेवर बेतलेली आहे. स्वत:च्या जीवनाचा अर्थ शोधून नवा समाज निर्माण करण्यासाठी लढणाऱ्यांची तरुण पिढी तयार करणं हे निर्माणचं मुख्य उद्दिष्ट आहे.

'निर्माण'च्या शिक्षणप्रक्रियेदरम्यान तरुण मी, माझं कुटुंब, माझ्या मित्रमैत्रिणी याच्या बाहेर पडून 'मी कोण' यापेक्षा 'मी कोणाचा' या प्रश्नाचा शोध घेतो. माझं शिक्षण, अंगी असलेली कौशल्यं आणि समाजाची गरज यांची सांगड घालून मी समाजासाठी काय करू शकतो याविषयीचं मार्गदर्शन तरुणांना या प्रक्रियेदरम्यान मिळतं.

१९६०च्या सुमारास कामगार व दलित चळवळींनी सामाजिक जाणिवांना धार आणण्याचं काम केलं. १९७०मध्ये हेच काम युवक क्रांती दलाने पुढे नेलं. समाजात बदल घडवून आणणं ही त्या वेळची गरज होती. परंतु १९७५ नंतर हे चित्र पालटलं. सर्वच चळवळी मंदावल्या. मध्यमवर्गीयांना आणि उच्च-मध्यम वर्गीयांना औद्योगिकीकरणामुळे भारतात आणि भारताबाहेर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. त्यामुळे चळवळीतील तरुणांचा सहभाग अत्यल्प झाला. शिक्षण आणि नोकरीत दलितांची पहिली पिढी नुकतीच स्थिरावत होती व जुनं, अनुभवी नेतृत्व कमी होत होतं. अशा परिस्थितीत समाज प्रबोधनाचे मूळ प्रेरणास्रोतच लोप पावल्यामुळे चळवळींना मरगळ आली. ही स्थिती १९९०पर्यंत कायम राहिली. पण त्यानंतर समाजातील धार्मिक विद्वेष वाढले, आर्थिक तफावत वाढली. सामाजिक ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी खंबीर तरुण नेतृत्व निर्माण करण्याची गरज समाजातूनच उत्पन्न झाली. समाजातील समस्या सोडवण्यासाठी तरुणांना पद्धतशीर कृती कार्यक्रम देण्याचा असाच काहीसा प्रयत्न 'निर्माण' करत आहे.

गडचिरोलीतील 'शोधग्राम' इथे होणारी निवासी शिबिरं हे 'निर्माण'चं ठळक वैशिष्ट्य. चार शिबिरांची एक मालिका. वर्षातून दोनदा होणाऱ्या या शिबिरांना महाराष्ट्रातील निवडक ६०-७० मुलं एकत्र येतात. आतापर्यंत शिबिरांच्या २ मालिका पूर्ण झाल्या असून, महाराष्ट्रातील दोनशेहून अधिक तरुण 'निर्माण' प्रक्रियेला जोडले गेले आहेत.

'निर्माण'च्या शिबिरात नेमकं काय घडतं? 'मी कोणाचा' या प्रश्नाचा शोध घेताना 'मी कोण?' या प्रश्नाची जाण असणं आवश्यक असतं. आणि म्हणूनच स्वभाव, स्वधर्म, युगधर्म या सूत्राने डॉ. अभय बंग शिबिराची सुरुवात करतात. याशिवाय पाणीप्रश्न, शेती, शिक्षण, पर्यावरण या क्षेत्रांतील आव्हानांचा परिचय करून देणारी सत्रंही शिबिरांदरम्यान आयोजित केली जातात. या निमित्ताने त्या त्या क्षेत्रात सक्रिय सहभागी असणाऱ्या व्यक्तींशी भेटी होतात. पुस्तकं वाचली जातात, परस्परांमध्ये चर्चा होतात आणि समाजात अस्तित्वात असणाऱ्या शंभर समस्यांपैकी मी नेमक्या कोणत्या समस्येवर काम करू शकतो याचं उत्तर हळूहळू मिळत जातं.

गडचिरोलीतील निवासी शिबिरांदरम्यान विद्यार्थ्यांच्या संख्येबाबत मर्यादा येतात. साठहून अधिक विद्यार्थ्यांना इथे सहभागी करणं शक्य होत नाही. हा प्रश्न विविध शहरांमध्ये भरवल्या जाणाऱ्या स्थानिक शिबिरांद्वारे सोडवला जातो. या शिबिरांना मिळणारा तरुणांचा प्रतिसाद अभूतपूर्व असतो. आतापर्यंत मुंबई, औरंगाबाद, नाशिक, सांगली व मेळघाट या ठिकाणी स्थानिक शिबिरं झाली असून आतापर्यंत त्यात २०० तरुण सहभागी झाले आहेत. स्थानिक गटांच्या कामाला वेगळाच जोर असतो. मुळात हे सर्व तरुण एकाच भागातील असल्यामुळे सांघिकवृत्ती बळकट होण्यास मदत होते. तिथल्या स्थानिक समस्या, गरजा त्यांना माहिती असतात. त्यामुळे कामाचा उत्साह वाढतो. नाशिक, मेळघाट आणि मुंबईच्या आसपास या मुलांनी वाचनालयं सुरू केली आहेत. नाटकं, गाणी या माध्यमांतून धान्यापासून दारूविरोधी निदर्शनं सुरू केली आहेत. वृक्षारोपणाचे कार्यक्रम हाती घेतले जात आहेत. समाजोपयोगी कामं करायला गडचिरोली, जव्हार-मोखाडलाच जावं लागतं असं नाही, हे या स्थानिक गटांनी सिद्ध केलं आहे.

एका टप्प्यावर 'निर्माण'च्या शिबिरांमधून बाहेर पडल्यावर मिळालेलं ज्ञान बाहेरच्या जगात अजमावण्याची शिबिरार्थींना गरज वाटू लागली आणि यातूनच 'निर्माणीं'नी एखाद्या

विषयावर पूर्ण वेळ काम करण्याची संकल्पना पुढे आली. शिबिरार्थींनी आपल्या जिव्हाळ्याचा विषय निवडून त्या त्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थेत कामाचा अनुभव घेणं, यात अपेक्षित आहे. म्हणूनच एका वर्षानंतर स्वत:तील क्षमता आणि मर्यादा अजमावल्यावर त्या विद्यार्थ्याने संस्थेपासून विलग होऊन स्वतंत्रपणे काम करावं असंही अपेक्षित आहे. आतापर्यंत 'निर्माण'च्या १४ विद्यार्थ्यांनी एम.के.सी.एल., सर्च, बाएफ, ग्राममंगल यासारख्या संस्थांमध्ये असं काम केलं आहे. प्रत्यक्ष कामातून आलेलं शहाणपण आणि त्यांनी कमावलेला आत्मविश्वास हा खरोखरच उल्लेखनीय आहे.

मूळचा जळगावचा गोपाळ महाजन, पुण्यात धान्याधारित मद्य निर्मितीविरुद्ध लढा देत असलेला सचिन तिवले, पर्यावरणीय असमतोलावर काम करत असलेली अमृता प्रधान, रोजगार हमीशी जोडला गेलेला प्रियदर्शन सहस्रबुद्धे असे अनेक तरुण 'निर्माणी' महाराष्ट्रभरात कामाला लागले आहेत. काही स्वयंप्रेरित, काही दुसऱ्याच्या कामातून प्रेरणा घेऊन.

'कुमार निर्माण'विषयीही इथे सांगायला हवं. 'निर्माण' ही नुसती शिक्षणप्रक्रिया न राहता हळूहळू जीवनपद्धती व्हायला हवी, 'निर्माण'चं काम आणि दैनंदिन जीवन हे वेगळं नसावं, प्रत्येक कृतीला सामाजिक बांधिलकीची पार्श्वभूमी असावी आणि ही भावना जर लहानपणापासूनच मनात रुजवली तर अजून ४० वर्षांनी 'निर्माण'ची गरज कदाचित संपूनच जाईल अशी 'कुमार निर्माण' या नवीन उपक्रमामागची संकल्पना आहे. यात आठवी-नववीचा शालेय कुमारगट डोळ्यांसमोर ठेवून सामाजिक मूल्यांचं महत्त्व सांगणाऱ्या सत्रांचा समावेश केला आहे. शांतीचं महत्त्व, पर्यावरणाचा ऱ्हास, दारूचे विपरीत परिणाम हे सर्व नाटुकल्यांच्या रूपाने किंवा गोष्टींच्या माध्यमातून 'निर्माण'चे स्वयंसेवक मुलांसमोर मांडतात. हा उपक्रम प्राथमिक स्वरूपात पुणे, नाशिक, सांगली इथे सुरू झाला आहे.

गेल्या चार वर्षांत 'निर्माण'ने काय साध्य केलं याचं उत्तर द्यायला 'निर्माण' खरं तर बाल्यावस्थेत आहे. पण आज निर्माणच्या यशाला विविध परिमाणं लावता येतील. समाजात असंख्य प्रश्न आवासून उभे आहेत आणि त्याला धैर्याने सामोरं जाण्याची गरज आहे याची जाणीव 'निर्माण' तरुणांना देऊ पाहत आहेत. महाराष्ट्रातल्या भिन्न शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक स्तरांतील युवक-युवतींना समाज नवनिर्माणाच्या समान सूत्राने बांधून ठेवण्याचं यश निर्माणच्या पाठीशी नक्कीच आहे. निर्माण प्रक्रियेत सहभागी होण्यापूर्वीचा तरुण आणि नंतरचा तरुण यात झालेला बदल लक्षणीय असतो. आता त्याला आपणहून प्रश्न पडतात, त्या आणि त्या प्रश्नांच्या उत्तरासाठी तो पडत धडपडत का होईना, प्रामाणिकपणे प्रयत्न करतो. आज महाराष्ट्रातल्या अनेक महाविद्यालयीन तरुणांना 'माझ्या शिक्षणाचं पुढे काय?' ही समस्या भेडसावत आहे. ही समस्या सोडवण्यात 'निर्माण'ची प्रक्रिया नक्कीच सहाय्य करते आहे. अर्थात आपल्याला सगळ्या समस्यापूर्तींचा हमखास फॉर्म्युला मिळाला आहे असा आव 'निर्माण' आणत नाही, पण समाजातील अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांकडे डोळसपणे पाहण्याची दृष्टी मात्र 'निर्माण'ने या युवकांना नक्कीच दिली आहे. जैसे थे परिस्थितीत बदल घडवण्यासाठी धोपटमार्ग सोडून एकमेकांच्या साहाय्याने आडवाटेने प्रवास करण्याचं धाडस शिबिरार्थींनी या प्रक्रियेत मिळवलं आहे.

समाजातील प्रश्न तर खुणावत आहेत, पण त्यासाठी आयुष्याची घडी विस्कटण्याची हिंमत मात्र होत नाही. ही कोंडी फोडण्यास निर्माणची शिक्षणप्रक्रिया तरुणांना नक्कीच साह्य करेल अशी आशा दिसते आहे ती त्यामुळेच.

**- चारुता गोखले**

मोबाइल : ९८१९९११०७३

◆

**- निर्माण**

इ-मेल : nirman@gmail.com

वेबसाइट : http://nirman.mkcl.org